Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# खानदेशातील कन्या : सोन्याची खाण

प्राचार्या डॉ. वैशाली सू. रोकडे
का.व.ना.नाईक शि.प्र.संस्थेचे, कला व वाणिज्य महाविदयालय ,दिंडोरी जि.नाशिक.

*प्रस्तावना–*

खानदेशातील अहिराणी ही समृध्द भाषा आहे. ही भाषा साधी सोपी प्रवाही आहे. मराठी आणि अहिराणी भाषेची लिपी एक आहे. या भाषेतील लोकगीते हा मोलाचा ठेवा सर्व समाजासमोर आणावा ही या संशोधन विषयामागची भूमिका आहे. त्यात भारतातील मुलांच्या प्रमाणापेक्षा मुलींचे प्रमाण कमी होत आहे. याची कारणे शोधता मुलीविषयीचा जिव्हाळा कमी होतांना दिसतोय. महाराष्ट्रातील खानदेश हा असा प्रांत आहे की या प्रांतात मुलीला ' लक्ष्मी ' समजले जाते. आपल्या मुलीचे चरणस्पर्श करून प्रत्यक्ष पिता आर्शीवाद घेतात. अशा या खानदेशी संस्कृतीमध्ये कन्या मुलीविषयी विचार व दृष्टीकोन समाजासमोर ठेवण्यासारखा आहे. या सोन्याच्या खाणीविषयी लोकगीतातून जे कन्याप्रेम अनुभवायला मिळाले ते या विषयातून मांडले आहे.

"

मयनान चालून हालन मालन
रस्त्याने चाले जशी केयीनी कमयन "||

मयना म्हणजे कन्या.... कन्येला मैना या पक्षीणीची उपमा दिलेली आहे. ही मैना रस्त्याने चालते तेव्हा ती मालनसारखी चालते..... आणि तिची चाल केळीतील कमळ जसे दिसते तशी.... .

" पिताजीनी दिन्हया लेकी
जागा देखी तुलसी रोयी "||

पित्याने चांगल्या ठिकाणी म्हणजे घर सुबत्तत पाहून लोकी दिलेल्याआहेत. जसे काळीभोर जागा पाहून तुलसीचे रोप लावले जाते तसे.... .

" लेक लेक करू लेक दुखले काम ये मनी.... .



लेकना बिगर सर्गेनी वाट लागस सुनी "||

आईबापाच्या सुखदुखात लेक कामी येते ही भावना आईवडिलांची या ओवीत दिसून येते. आणि म्हणून लेक लेक करू लेक दुखले काम ये.... इतकेच काय लेकीवरचे अपार प्रेम असल्यामुळे आयुष्याच्या शेवटच्या वाटेवर जातांना जर मयना भेटली नाही तर स्वर्गाची जरी मिळाली तरी आनंद होणार नाही. असे या ओवीतून प्रेरीत होतेय.
आईच्या जात्यावरच्या ओव्या...पुत्र आणि कन्या या दोघांनाही सारखे प्रेम करणारी आई म्हणते

" राघू मन्हा हिरा मयना मन्ही हिरकनी
हिरकनी लिन्हात मी कुबेर ना दुकानी "||

मुलगा माझा हिरा आणि मुलगी माझी हिरकनी या उपमा दिलेल्या आहेत. कुबेर हा धनसंपत्तीचा देव या देवाकडून मी हे मौल्यवान रत्ने घेतली आहेत. ही आत्मप्रौढी आहे.

" मयना बोलस चालस चांदन झिरपस
मयनाले देखी जग दुनिया दंग व्हस.... ." लेकीचे कौतुक कसे ते पाहूया " लेक बोलस चालस चांदन झिरपस".... लेक चालते बोलते तेव्हा जणू चांदणे झिरपते. तिचे बोलणे चालणे पाहून सारी दुनिया दंग, आश्चर्य चकीत होते.

" लाडकी व लेक लाडे लाडे घर झाडे
कोथमिरी इडा इना मनगटे मोर डोले..."|| ही लाडकी लेक लाडेलाडे घर झाडते. तेव्ह भारीच वाटते.

लोकगीत या निर्मितीविषयी दुर्गा भागवत म्हणतार्त" लोकगीते समाजमनाला एकसमयावच्छदाने बहुतेक सर्वांना सुचतात अमूक एका व्यक्तची कारागिरी त्यांच्यात दिसणे शक्य नाही. लोकगीते उत्सवप्रसंगी भक्तीभावाने तल्लीनता प्राप्त झाल्यावर सामाजिक मन एकतान झाले असतांना निर्माण होतात. अर्थात कोणाही एका व्यक्तीला अशा गीतावर हक्क सांगता येत नाही."[1]
अहिराणीतील कानबाईचा उत्सव, गौराई चा उत्सव व लग्न सोहळा यावेळी गायिली जाणारी गिते सामूहिक मनाच्या आनंदाचे प्रतिक आहे. समाजमनाला या गीतांनी एकत्रित बांधले . एकत्रित कुटुंब पध्दतित सर्वांशी जुळवून घेतले. या स्त्रियांनी जगण्याची कला शिकविली. त्यांच्या जीवनाची चिंतनशिलता खरोखरच अंर्तमुख बनविणारी आहे. खानदानी नार आपल्या वागण्यातून कसे कौटुंबिक मूल्ये सांभाळतांना दिसते.

" उभी गल्ली जाऊ पाटपोट झाकूनी
बागुनी वागाव आयबान नांव राखुनी
उभी गली जाऊ वर करू ना पापानी
पिता मन्हा वाघ त्यानी जीवले धासनी." हया ओवीतील नीतीमूल्ये ही बंधन नसून कुलाच्या मर्यादा म्हणून संभाळल्या गेल्या आहेत.
अति कणखर उपदेश पुढिल ओवीतून आहेत.... .

" पाया पडी पडी डोंक नही झिजस...
खानदानी नार ले सांगन नही पडस "||

मोठयांचा पाया पड हे जी स्त्री खानदानी असते तिला सांगावे लागत नाही. आज व्यक्ती स्वातंत्रयाच्या अतिरेकात व स्वैराचारात मूल्य व चारित्रय धोक्यात येत आहे. आणि म्हणून संस्कृती टिकणे गरजेचे वाटते. संस्कृतीविषयी प्रा. शेणोलीकर व प्रा. देशपांडे यांनी "सस्कृती म्हणजे मानसिक उन्नतीचा दर्शक असा जीवनविकास किंवा आदर्श जीवन पध्दत."[2] असे मत प्रकट केले आहे.
संस्कृतीबाबत देशपांडे असे म्हणतात. " संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट पध्दत म्हणजे संस्कृती."[3]
भारतीय संस्कृती व्यापक आहे. मराठी संस्कृतीने भारतीय संस्कृतीचे प्रादेशिक अंग आहे. हा संस्कृतीचा ठेवा एका पिढीकडून दुसरया पिढीकडे मौखिक रूपात दिला जातो.. मौखिक परंपराविषयी

" दसरापासून दिवायी राहिनी तीन हाट
राजहंसदादा मयना हिरकनी जोस वाट"||

भार्वभावनांची अभिव्यक्ती वरील ओवीत दिसते . दसरयापासून दिवायी तिन हाट ह्य बाजार ह् राहते . तेव्हापासून मैना हिरकणी आपल्या बंधूची म्हणजे राजहंस दादाची वाट पहातेय . आपल्या भावाच्या भेटीसाठी मयना अतुर झालेली आहे हे तिन आठवडे कसे जातील ही चिंता तिला सतावतांना दिसतेय .

" गंजीधर भाऊ तुन मरजीले भ्यावू... .
खांदावरना पदर डोक्यावर लेवू "||

भावाच्या इभ्रतीला घाबरून खांदयावरचा पदर डोक्यावर ही खानदेशी स्त्री घेते . भावाच्या इभ्रतीची काळजी तिला आहे . ते गीतात गाऊन संस्कृतीचे दर्शन घडते . पिता म्हणतो

" लाडकी व लेकवाई ठेव नी बानी
जानार नही मना पगडीनं पानी "||

मानवी जीवनातील विविध भावभावना सुखदुखाचे अनुभव प्रथम व्यक्तीगत पातळीवर व त्यानंतर सामूहिक पातळीवर व्यक्त होतात . तेव्हा त्या भावना व सुखदुखे व्यक्तीगत पातळीवर न राहता सामूहिक पातळीवर येऊन त्या समाजाचे व समाजमनाचे प्रतिनिधित्व करतात . डॉ . प्रभाकर मांडे म्हणतार्त " लोकगीतामागील प्रेरणा संमीश्र स्वरूपाच्या असतात . त्यात व्यक्तीगत सामाजिक आणि कलात्मक प्रेरणाचा समावेश असतो . "[४]

खानदेशी नार म्हणते
" दयन दयाव जसं चंदन किसवा... .
माय म्हने असा परदेस काढावा..."

दयन दळावा या श्रमाला कष्ट न म्हणता चंदन किसन्याचा आनंद त्यातून मिळावा आणि असाच सासरचा आनंद सुगंधीत करावा . असे हे आपल्या माय माऊलीचे सस्कार नारला आठवतात .

लेकीच्या कौतुकावरोवर तिला जवईचे सुध्दा कौतुक तितकेच वाटते .

" जवईन मुख देखस सासू सानावाटे... .
मंडोदर लेकी तारा चांदनीना तुटे... . "||

खानदेशात सासु आणि जावई या नात्यात एक आदराच अंतर असते . म्हणून आपल्या चांदणीसारखी लेक ज्यांना दयायची आहे ते जावई दिसायला कसे आहेतऋ ही उत्सुकता सासुला आहे . आणि तिची उत्सुकता पूर्ण करण्यासाठी सासू सर्वासमोर जावयाला पाहू शकत नाही काही समाजाचे संकेत तिला पाळायचे आहेत तरी लेकीचा भरतार तिला बघायचा आहे आणि म्हनून सासू जावयाला सानावाटे पहातेय .

काळ बदलतो काळावरोवर समाजाचे संकेतही बदलतात आणि पिढीही . बदलत्या संदर्भानुसार पिढीही व विचारही बदलतात .

" नवतीनी नार तुनी नवती सभ्हाय
रस्त्याने चाले जशी केयीनी कमय
राजमायनाले मांगन
सोयरा बसना मांडी मोडी... .
मयना रेशमनी घडी... .
सोयरा मांगस हातजोडी . . "||

तारूण्याने भारलेली युवती नवतीनी नार तुझं तारूण्य सांभाळ ... . या राजमयनाले बघायला पाहूणे आले आहेत . आणि तिला मांगण घातले आहे . आलेले पाहुणे मांडी घालून बसलेले आहेत . ते हातांची जोडी मागत आहेत . मुलीला बघायला पाहुणे आलेत हा प्रसंग वरील ओवीत आलेला आहे .

वाप म्हने लेक तुनावर सोनानी सावली
जाशी परघर लागी उननी तुले झायी
आयवान्या लेकी लेकी हालन मालन
मंजूय बायनं कसं राजवनसी चालनं"

लोकगीताविषयी शरद व्यवहारे म्हणतात " लोकगीते हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे . त्या आत्मपिंडातुन स्त्रवणारे भाव निर्झर मनुष्यमात्रा जीवनप्रणालीचेप्रकृती आणि प्रवृत्तीचे दयोतक ठरतात . " वरील ओवीतील शब्द भावनेचा जिव्हाळा घेऊन अवतरले आहेत . या शब्दांना वेगळे देखणेपण आहे . उदा . राजमयना लहुलाडी सोनचिडी हिरकणी हिरा लाल मंजूय गुजरन सायंकी मयना रेसमनी घडी भरतार लाडी इ . शब्द लोकगीतातील वैभव दाखवितात .

'खानदेशातील स्त्रीगीते' या ग्रंथात प्रा . उषा सावंत यांनी विस्तृतपणे स्त्री गीतांचा अभ्यास केला आहे . "कस्तुरीना... . . " ही वाचतांना त्या म्हणतात " हेच खरे अस्सल काव्य! अभिजात काव्य ! कालिदासाच्याज्ञानेश्वराच्या किंवा शेक्स्पीअर प्रतिमेच्या तोडीच्या या ओळी आहेत . या अनाम प्रतिभाशाली कावयित्रींच्या हा प्रतिभेचा हा उत्सव चार भिंतीतच बंदिस्त होता . काव्याच्या या देखण्या उत्सवाचा रसानंद सारया रस्किांपर्यंत पोहचवावा या उद्देशाने हा शोधप्रबंध लिहिला गेला . "[५]

लेकीसाठी गायिलेले एक वात्सल्य भावना हेलावणारे प्रसिध्द स्त्रीगीत... .

"लाडकी लेक बापामध्ये जेवू नको
जाशी परघर एतली माया लावू नको
मैना लाडकोड नी कोनता राजानी रानी
कोनताा देसले देवू  राजमयना हिरकनी
राजमयनाना गोंडयादिरी हात लागस मऊ
मयना रेसमनी घडी कोनता राजाले देऊ
मयनाना पायनावर रघूमैना डोले
घुंघुरी झुमझुम वाजे जशी चांदनी डोले
मयनाले जप लागनी नितय झिरपस चांदन
मयनानी माय हरखनी  डोलस तिरीभुवन "||

लेक लाडाची म्हणून आईबापााचं नितांत प्रेम लेकीवर... . . अश्या लाडकया लेकीकडे बघून ओवी गायिली जातेय... . लेक मोठी झाली आहे...तिचं लग्न कराव लागेल या कल्पनेने लेकीचे आईबापांच्या मनातल्या मनात  कालवाकालव झालेली आहे . म्हणून लाडकी लेक लहानपाणापासून बापामध्ये एका ताटात एकत्रित बसून जेवते .  लग्नानंतर हे संपुष्टात येणार आहे म्हणून बापाले एवढा जीव लावू नको कारण तुला आता परघरी जायचे आहे . दुसरया ओळीत मयना म्हणजे कन्यालेक कोणत्या देशाला देऊ कारण कन्येचे दान करायचे असते संस्कृतीची जाणही आहे . कोणत्या राजाला देऊ हा विचार आईबापाला येणे साहजिक आहे . आपल्या लेकीची सौंदर्याची वाखाणणी ही आई या शब्दात करते . ' राजमयनाना गोंडगिरी हात लागस मऊ ' मऊ हात असलेली कन्या नाजुक आहे . ही अशी नाजुक कन्या कुनास दयावी ॠ हा प्रश्न ती स्वतास विचारते . या सुंदर कन्यकडे मोठया अभिमानाने आई पहाते . आपल्या सुंदर कन्येकडे पाहून आईचे मन हारखून  जाते . सर्व विश्वाकडे ती अभिमानाने पहाते . या अर्थपूर्ण लोकगीतांच्या बाबतीत डॉ . शरद व्यवहारे म्हणतात " लोकगीतातील समर्पक अर्थपूर्ण शब्द मनोहर रचना त्यामुळे ती आकर्षक आहेत ."[6]

वरील ओवीत असलेले घुंघूरूंचा झुनझुननाद डोलणारी चांदनी त्रिभुवन दसणारे चांदणे ... . या शब्दरचना अंर्तमुख करणारया आहेत .

उच्च प्रतीच्या वाड .मयाच्या दृष्टीने स्त्रीगीतांचा विचार करतांना खानदेशी स्त्री गींताचा विचार करता खानदेशी स्त्री गीतात उच्च दर्जाचे वाड .मयीन वैशिष्टये आढळते . मानवी मनातील भावभावना आणि विचार वाड .मयातून व्यक्त होत असतात . सत्य आणि सौंदर्य यामुळे अनुभवाच्या समृध्दतेला आकार येतो . खानदेशातील या घरोघरी असलेल्या वहिणवाईचे हे शाश्वत अहिराणीतील लोकगीते ओठांवर गुणगुणल्या खेरीज राहत नाहीत .

संदर्भ सूची

1 ) भागवत दुर्गा  'लोकसाहित्याची रूपरेखा' वरदा प्रकाशन पुणे प्र . आ . 1935 पृ . 382
2) प्रा .  शेणोलेकर व देशपांडे ' महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास' मोघे प्रकाशन कोल्हापूर 1972 प्र . आ :  पृ . क . 4
3) प्रा .  शेणोलेकर व देशपांडे ' महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास' मोघे प्रकाशन कोल्हापूर 1972 प्र . आ :  पृ . क . 4
4) डॉ . मांडे प्रभाकर ' लोकसाहित्याचे स्वरूप .' परिमल प्रकाशन औरंगाबाद प्र . आ .  1978 पृ . 241
5) प्रा . डॉ .  सावंत  उषा  ' खानदेशातील स्त्रीगीते .' प्रतिमा प्रकाशन पुणेप्र . आ . 8 एप्रिल 2014 पृ . क . 324
6) डॉ . व्यवहारे शरद  मराठी स्त्रीगीते  प्रतिमा प्रकाशन पुणे 30 प्र . आ .  1991 पृ . क . 44

